महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com | दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/390 | दिनांक : 31 मार्च, 2021

---

**वाचा** :- 1. साथरोग कायदा, 1897

2.आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51

3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

4. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 15/03/2021

5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/314 दि. 16.03.2021.

6. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 27/03/2021

7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/373 दि. 27.03.2021.

---

## : : आदेश : :

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3, व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्याबाबतची नियमावली प्रसिध्द करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, कोरोना (कोविड-19) विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेव्दारे संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात **"मिशन बिगीन अगेन"(MISSION BEGIN AGAIN)** अंतर्गत संदर्भिय क्र. 04 अन्वये काही ठरावीक बाबीकरीता प्रतिबंध/सुचनात्मक आदेश निर्गमीत करण्यात आलेले असल्याने या कार्यालयाचे संदर्भीय क्र. 5 अन्वये उक्त आदेश चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात यथास्थिती लागु करण्यात आलेले होते.

आणि ज्याअर्थी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 06 चे आदेशान्वये कोरोना विषाणूच्या वाढत्या पार्श्वभुमीवर संपुर्ण महाराष्ट्रात काही ठरावीक बाबींस दि. 30.04.2021 पावेतो प्रतिबंध करण्यासंबंधाने आदेश निर्गमीत केलेले असल्याने, राज्य शासनाकडील उक्त आदेशातील संपुर्ण तरतूदी चंद्रपूर जिल्हयातील कार्यक्षेत्रात दिनांक 30 एप्रिल, 2021 पावेतो संदर्भ क्र. 07 चे आदेशान्वये यथास्थिती लागु करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी चंद्रपूर जिल्हयातील कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावात दिवसें-दिवस वाढ होत असुन रुग्ण संख्या झपाटयाने वाढत आहेत तसेच सदर विषाणूचा आजार हा संसर्गजन्य असल्याने कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सार्वजनिक जनतेच्या आरोग्याबाबत धोकादायक परिस्थीती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावात अधिक वाढ न होण्याचे दृष्टीकोणातून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याने, नागरीकांची सतत होणारी गर्दीच्या ठिकाणाबाबतीत काही ठरावीक बाबींस प्रतिबंध करणे आवश्यक झालेले आहे.

त्याअर्थी, **मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर असे आदेशीत करतो की,**

- संपूर्ण चंद्रपूर जिल्हयातील वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत आस्थापना जसे हॉस्पीटल, दवाखाने, मेडीकल, पॅथॉलॉजी, रक्तपेढी व तत्सम आस्थापना वगळता सर्व दुकाने/आस्थापना/मार्केट दररोज सकाळी 07.00 ते रात्री 08.00 या वेळेत सुरु राहतील.
- 05 किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती यांना रात्री 08.00 ते सकाळी 07.00 या कालावधीत एकत्रित येण्यास मनाई राहील. संबंधीत व्यक्तींकडून उल्लंघन झाल्यास/केल्यास रु. 1000/- प्रति व्यक्ती याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
- सर्व सार्वजनिक ठिकाणे (बगीचे, उद्याने, खेळाची मैदाने, मोकळया जागा) रात्री 08.00 ते सकाळी 07.00 या कालावधीत बंद राहतील. संबंधीतांकडून उल्लंघन झाल्यास रु. 1000/- प्रति व्यक्ती याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
- सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर न केल्याचे आढळल्यास रु. 500 /- व सार्वजनिक ठिकाणी थुंकतांना आढळल्यास रु. 1000/- इतका दंड संबंधीतांवर आकारण्यात येईल.
- सर्व चित्रपटगृहे (सिंगल स्क्रीन, मल्टीप्लेक्सेस), मॉल्स, सभागृहे, रेस्टॉरंट, हॉटेल्स सर्व दुकाने, आस्थापना, मार्केट रात्री 08.00 ते सकाळी 07.00 या कालावधीत बंद राहतील. **सकाळी 07.00 ते रात्री 08.00 या वेळामध्ये हॉटेल्स, रेस्टॉरंट बैठक क्षमतेच्या 50 टक्के ग्राहकांच्या उपस्थितीत सुरु ठेवता येतील तसेच रेस्टारंट, हॉटेल्स यांना रात्री 11.00 वाजेपावेतो घरपोच सेवा सुरु ठेवता येईल.**
    - या आदेशातील अटींचे उल्लंघन अथवा राज्य शासनाकडील दि. 15.03.2021 व दि. 17.03.2021 मधील अटींचे उल्लंघन केल्यास चित्रपटगृहे/हॉटेल्स/रेस्टारंट कोव्हिड-19 रोगाची साथ आटोक्यात येईपर्यंत बंद करण्यात येईल.
- कोणत्याही प्रकारचे सामाजिक/सांस्कृतिक/राजकीय/धार्मीक कार्यक्रम आयोजीत करण्यास मनाई असेल. तसेच सभागृहे व नाटयगृहे यांचा सदर कार्यक्रमाकरीता वापर करता येणार नाही.
    - सदर अटींचे उल्लंघन झाल्यास/केल्यास संबंधीतांवर आपत्ती कायद्यानुसार दंड आकारण्यात येईल तसेच सदर मालमत्ता कोव्हिड-19 रोगाची साथ आटोक्यात येईपर्यंत बंद करण्यात येईल.
- लग्न समारंभ केवळ 50 व्यक्तींच्या उपस्थितीत आयोजीत करता येतील.
    - तथापी याकरीता संबंधीत उपविभागीय अधिकारी/तहसिलदार/पोलीस विभागाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.
    - लग्न आयोजन संबंधाने दिलेल्या निर्देशाचे भंग झाल्याचे आढळल्यास आपत्ती कायद्यानुसार जागेच्या मालकावर दंड आकारण्यात येईल तसेच सदर मालमत्ता कोव्हिड-19 रोगाची साथ आटोक्यात येईपर्यंत बंद करण्यात येईल.

- अंत्यविधी साठी केवळ 20 व्यक्तींच्या उपस्थितीस परवानगी असेल. तथापी या अटींचे पालन करण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची असेल.
- सर्व प्रकारची खाजगी कार्यालये (वैद्यकीय क्षेत्र व अत्यावश्यक सेवेशी निगडीत कार्यालये वगळता) 50 टक्के कर्मचारी क्षमतेने सुरु ठेवावीत.
    - तथापी, शासकीय / निमशासकीय कार्यालयाच्या बाबतीत कार्यालयीन प्रमुखांनी कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत कोव्हिड-19 संदर्भात असलेल्या प्रोटोकॉलचे पालन होत असल्याचे सुनिश्चीत केल्यानंतर निर्णय घ्यावा.
    - उत्पादन क्षेत्र पुर्ण क्षमतेने कार्य करु शकतील.
    - तथापी उत्पादनाच्या ठिकाणी पुरेसे सामाजिक अंतर सुनिश्चित करण्यासाठी कर्मचा-यांची संख्या कमी ठेवावी असे राज्य शासनाचे निर्देश आहेत.
    - सामाजिक अंतर राखण्याचे उद्देशाने उत्पादन प्राधिकरणांना स्थानिक प्रशासनाकडून मंजुर केल्यानुसार कामकाजाच्या पाळीत वाढ करण्याची परवानगी दिली जाऊ शकते.
    - **<u>उत्पादन क्षेत्रांना खालील निर्बंधाचे पालन करणे आवश्यक राहील :-</u>**
        - कर्मचारी/कामगार यांनी मास्क न घालता प्रवेशास परवानगी दिली जाणार नाही.
        - तापमान मोजण्याचे साधन प्रवेश स्थळी वापरली जात असल्याची खात्री करावी.
        - परिसरातील प्रत्येक ठिकाणी हात धुण्याकरिता साबन अथवा सॅनिटायजर्स ठेवावीत.
        - सदर क्षेत्रातील व्यवस्थापनांनी बाहेरील येणा-या अभ्यांगतांकडून मास्क परिधान करणे तसेच सामाजिक अंतर कायम राखणे याची सुनिश्चितीकरीता पुरेसा मनुष्यबळ नेहमी उपस्थित ठेवावा.
        - शक्यतोवर खाजगी कार्यालये यांनी Work From Home या पर्यायावर भर द्यावा.
        - उपरोक्त अटींचे संबंधीत उत्पादन आस्थापनाकडून उल्लंघन झाल्यास सदर उत्पादन आस्थापना कोव्हिड-19 साथीचा रोग आटोक्यात येईपर्यंत बंद करण्यात येईल. तसेच आपत्ती कायद्यानुसार संबंधीत आस्थापनावर दंड आकारण्यात येईल
- शासकीय कार्यालयांमध्ये गर्दी कमी होण्याचे दृष्टीकोणातून लोकप्रतिनीधी व्यतिरिक्त इतर अभ्यांगतांना तातडीच्या कामाशिवाय परवानगी दिली जाऊ नये.
    - ज्या अभ्यांगतांना बैठकीसाठी बोलविण्यात आले आहे त्यांच्या बाबतीत विभाग/ कार्यालय प्रमुखांनी विशेष पास द्यावीत.
- **सर्व धार्मीक स्थळाच्या व्यवस्थापनाने जागेच्या उपलब्धतेनुसार एका तासाकरीता प्रवेश देण्यात येणा-या अभ्यागतांची संख्या निश्चित करावी. अभ्यांगतांकरीता ऑनलाईन आरक्षणासारख्या सोयीची सुरवात करावी. तसेच या ठिकाणी प्रवेशाकरीता <u>खालील निर्बंधाचे पालन करणे आवश्यक राहील :-</u>**
    - कर्मचारी/कामगार यांनी मास्क न घालता प्रवेशास परवानगी दिली जाणार नाही.
    - तापमान मोजण्याचे साधन प्रवेश स्थळी वापरली जात असल्याची खात्री करावी.
    - परिसरातील प्रत्येक ठिकाणी हात धुण्याकरिता साबन अथवा सॅनिटायजर्स ठेवावीत.
    - सदर व्यवस्थापनांनी बाहेरील येणा-या अभ्यांगतांकडून मास्क परिधान करणे तसेच सामाजिक अंतर कायम राखणे याची सुनिश्चितीकरीता पुरेसा मनुष्यबळ नेहमी उपस्थित ठेवावा.
- सर्व शासकीय कार्यालयासमोर मोर्चे, धरणे, आंदोलन, उपोषण करण्यास निर्बंध राहतील.

सदर आदेशाची कोणतेही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता कलम 188 तसेच साथरोग कायदा 1897 अन्वये दंडनीय/कायदेशीर कार्यवाही संबंधीत पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांनी करावी.

**सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दि. 31.03.2021 रोजी निर्गमीत करण्यात येत आहे. तसेच सदरचा आदेश दि. 30.04.2021 पावेतो चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात लागु राहील.**

सही/-
(अजय गुल्हाने)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर

**प्रतिलीपी :- माहितीस सविनय सादर.**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई – 032
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
8. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
9. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
10. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
11. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)

**सदर आदेशास उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

D/ Rajesh Nikhare/144/Mission Begin Again Order